


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १५५
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.१६ जानेवारी २०२५


## वारी हनुमान संस्थानवर दरोडा पुजाऱ्याला बांधून लाखोंचा ऐवज लंपास



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, बुलढाणा :** बुलढाणा अकोला जिल्ह्याच्या आणि मध्यप्रदेशच्या सीमेला लागून असलेल्या सुप्रसिद्ध वारी हनुमान संस्थान येथे आज धाडसी दरोडा पडला. अज्ञात दरोडेखोरांनी मंदिराच्या पुजारीला बांधून ठेवत मंदिरातील दागिने आणि दानपेटीतील रोख रक्कम असा लाखोंचा ऐवज लंपास केला .या परिणामी जिल्ह्यासह राज्यभरातील लाखो भाविकांत खळबळ उडाली असून जनमानस प्रक्षुब्ध झाल्याचे चित्र आहे. आज बुधवारी, पंधरा जानेवारीला उत्तररात्री हा थरारक आणि तितकाच धक्कादायक घटनाक्रम घडला आहे .घटनास्थळी वरिष्ठ पोलीस अधिकारी, श्वान पथक, हस्त मुद्रा तज्ञ दाखल झाले आहे. ठिकठिकाणी नाकाबंदी करून दरोडेखोरांचा युद्ध पातळीवर शोध घेण्यात येत आहे.

सातपुड्याच्या पायथ्याशी व मध्यप्रदेशच्या सीमेवर असलेले वारी हनुमान हे मंदिर समर्थ रामदास स्वामी यांनी स्थापित केल्याची वंदता आहे. वान प्रकल्प परिसरात निसर्ग रम्य परिसरात हे पुरातन जागृत असे हनुमानाचे मंदिर आहे. बुलढाणा, अकोला आणि विदर्भासह राज्यातील लाखो भाविक, पर्यटक इथे वर्षभर येतात. परराज्यातून देखील या ठिकाणी भाविक येत असतात. यामुळे या संस्थानात आज बुधवारी उत्तररात्री पडलेल्या दरोड्याने विश्वस्त आणि लाखो भाविकांना मोठा धक्का बसला आहे.

दुर्गम भागातील या मंदिरावरील दरोड्याचा विस्तृत तपशील अजून प्राप्त झाला नाहीये.प्राप्त प्राथमिक माहितीनुसार दरोडे खोरांच्या सुसज्ज टोळीने पुजारीला धाक दाखवून बांधून ठेवले. यानंतर हनुमान , गणेश मूर्तीवरील मौल्यवान दागिने लंपास केले .यामध्ये हनुमान मूर्तीवरील दोन हार ,कंबरपट्टा, हातकडे, पैंजण, कान, मुकुट, छत्र गणेश मूर्तीवरील मुकुट चा समावेश आहे .तसेच दानपेटी सुद्धा फोडून त्यातील मोठी रक्कम दरोडेखोरानी लंपास केली आहे .हे दागिने आणि रोख रक्कम मिळून लाखोंचा ऐवज लुटण्यात आला आहे.प्राथमिक अंदाजनुसार कमीअधिक साडे पाच किलो चांदीचे दागिने व दान पेटीतील एक लाख रुपये घेऊन दरोडेखोरांनी पोबारा केल्याचा अंदाज आहे .याची अधिकृत पुष्टी होऊ शकली नाही. दुर्गम भाग असल्याने आणि मोबाईल संपर्क होत नसल्याने पोलीस अधीकाऱ्यांशी संपर्क होऊ शकला नाही .सोनाळा पोलीस ठाण्याचे अधिकारी, कर्मचारी, वरिष्ठ अधिकारी, विविध पथके घटनास्थळी दाखल झाली आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते खारघर मधील इस्कॉन मंदिराचे उद्घाटन



**अक्षराज : दत्तात्रय शिंदे/अमोल सूर्यवंशी**

**दि.१५, खारघर (पनवेल) :** आशिया खंडातील दुसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या सर्वात मोठ्या इस्कॉन मंदिराचा आज उद्घाटन सोहळा श्री राधा मदन मोहनजी मंदिर खारघरचे उद्घाटन कर्मठ युगपुरुष भारताचे पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी यांच्या शुभहस्ते संपन्न झाला .सोबत महाराष्ट्र राज्याचे महामहीम राज्यपाल, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच इस्कॉनचे अध्यक्ष, भारतीय जनता पार्टीचे आमदार, सर्व नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## खंडाळा राजेंद्र विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा



**अक्षराज : बाळू धायगुडे**


**दि.१५, खंडाळा (सातारा) :** दि.१०जानेवारी ते १३ जानेवारी २०२५ कालावधीत ६८ वी शालेय नॅशनल खो-खो स्पर्धा आदर्श गुरुकुल स्कूल पेटवडगाव कोल्हापूर या ठिकाणी आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेमध्ये १४ वर्षाखालील गटात राजेंद्र माध्यमिक विद्यालयातील तीन विद्यार्थी कु.प्रतीक खंडागळे,कु.स्वराज्य गाढवे व कु.स्वराज उतेकर यांची महाराष्ट्र संघासाठी राष्ट्रीय खेळाडू म्हणून निवड झाली होती. या नॅशनल संघाने अजिंक्यपद पटकावल्यामुळे राजेंद्र विद्यालयाच्या शिरपेचा मध्ये आणखीन एक मानाचा तुरा खोवण्याचा मान या विद्यार्थ्यांना मिळाला. या नॅशनल स्पर्धेमध्ये महाराष्ट्र संघाने उपांत्य फेरीत गुजरात संघावर मात करून अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामना महाराष्ट्र विरुद्ध तेलंगणा संघाचा झाला .या अंतिम सामन्यात महाराष्ट्र संघाने तेलंगणा संघावर पंधरा विरुद्ध चार अशी मात करून अजिंक्य पद मिळवून सुवर्णपदक पटकाविले.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे स्वागत जिल्हा क्रीडा अधिकारी ताराळकर साहेब व तालुका क्रीडा अधिकारी पाटील साहेब यांनी केले. त्याचप्रमाणे खंडाळा शहरातील शिवशक्ती ग्रामविकास मंडळ यांनी या विद्यार्थ्यांचे भव्य स्वागत शहरांमध्ये केले.या विद्यार्थ्यांचे विद्यालयामध्ये स्वागत करताना विद्यालयाचे प्राचार्य शब्बीर नालबंद यांनी या यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व ते म्हणाले योग्य परिश्रमाच्या जोडीला तज्ञ मार्गदर्शनामुळेच हे उज्वल यश विद्यार्थ्यांना मिळाले.

या प्रसंगी संस्थेचे सचिव माननीय अनिरुद्ध दादा गाढवे यांनी या विद्यार्थ्यांना उद्देशून म्हणाले भविष्यात विद्यालयाच्या इतिहासातील एक सोनेरी पान म्हणून यांच्या यशाचा उल्लेख करावा लागेल आणि येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी यांनी मिळविलेले यश प्रेरणादायी ठरेल असे सूचक उद्गार या प्रसंगी त्यांनी काढले.

# विस्तारवाद नाही, विकासवादाच्या भावनेने काम सुरू

## मुंबईत युद्धनौका आणि पाणबुडीचे उद्घाटन



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१५, मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मुंबईतील माझगांव डॉक येथे 'आयएनएस सूरत', 'आयएनएस निलगिरी' या युद्धनौकांचे आणि 'आयएनएस वाघशीर' या पाणबुडीचे जलावतरण करण्यात आले. दोन युद्धनौका व एका पाणबुडीचे एकाचवेळी जलावतरण होणे, ही भारताच्या संरक्षण क्षमतेच्या दृष्टीने महत्त्वाची बाब आहे. 'आयएनएस' सूरत ही सर्वांत मोठी आणि अत्याधुनिक विनाशिका आहे. ही क्षेपणास्त्रवाहू (पी१५बी गाईडेड मिसाईल) प्रकल्पातील चौथी आणि शेवटची विनाशिका आहे. यामध्ये ७५ टक्के तंत्रज्ञान स्वदेशी आहे. 'आयएनएस निलगिरी' ही (पी१७ए स्टेल्थ फ्रिगेट) या अत्याधुनिक तंत्रज्ञान प्रकल्पातील पहिली युद्धनौका आहे. 'आयएनएस वाघशीर' ही (पी७५ स्कॉर्पियन) प्रकल्पातील सहावी पाणबुडी असून फ्रान्सच्या सहकार्यातून ती बनविण्यात आली आहे. या जलावतरणावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपस्थितांशी संवादही साधला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, देशाच्या संरक्षणासाठी आपलं जीवन समर्पित करणाऱ्या प्रत्येकाला मी नमन करतो. भारताच्या सुरक्षेसाठी प्रयत्न करणाऱ्या वीरागणांना मी शुभेच्छा देतो. आज भारताच्या समुद्री वारसा नेव्हीच्या गौरवाशाली इतिहास आणि आत्मनिर्भर भारत अभियानासाठी मोठा दिवस आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी नौसेनेला नवं सामर्थ्य दिलं होतं, नवं व्हिजन दिलं होतं. आज त्यांच्याच पावन भूमीवर २१ व्या शतकात नौसेनेला सशक्त करण्यासाठी आम्ही मोठं पाऊल उचलत आहोत. हे पहिल्यांदा होतंय, जेव्हा एक डिस्ट्रॉयर, फ्रिगेट आणि सबमरिन तिघांना एकत्र कमिशन केलं जात आहे.

सर्वात गर्वाची गोष्ट हे की तिन्ही नौका मेड इन इंडिया आहेत. मी भारतीय नौसेना, कारागिर, श्रमिक आणि अभियांत्रिकांना शुभेच्छा देतो. आजचा कार्यक्रम आमच्या गौरवशाली वारशाला भविष्यातील आकांक्षाशी जोडतो. मोठ्या समुद्री यात्रा, कॉमर्स, शिप इंडिस्ट्री, डिफेन्स याला समुद्री इतिहास आहे. आपल्या इतिहासाकडून प्रेरणा घेऊन आजचा भारत मेजर मेरिटाईम पॉवरबनत आहे, असं मोदी म्हणाले.

**समुद्राच्या विकासासाठी सागराचा मंत्र !**

आज भारत पूर्ण विश्व ग्लोबल साऊथमध्ये विश्वासू आणि जबाबदारीच्या मित्राच्या नात्याने ओळखता जातो. भारत विस्तारवाद नाही तर विकासवादाच्या भावनेने काम करतो. भारताने नेहमी खुले, सुरक्षित, इन्क्लुझिव्ह, पॉस्परस इंडो पॅसिफिक रिजनचं समर्थन केलं आहे. समुद्राच्या विकासाची गोष्ट आली तेव्हा भारताने मंत्र दिला सागर सागराचा अर्थ, सिक्युरिटी अॅण्ड ग्रोथ फॉर ऑल इन दि रिजन. भारतासमोर जी २० अध्यक्षपद आलं तेव्हा जगाला आम्ही मंत्र दिला वन अर्थ, वन फॅमिली, वन फ्यूचर. जेव्हा करोनोशी लढत होते, तेव्हा भारताने व्हिजन दिलं वन अर्थ, वन हेल्थ. आम्ही संपूर्ण विश्वाला परिवार मानतो, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

## अनाथ, निराधार मुलांमधून पोलीस अधिकारी घडावेत यासाठी आम्ही मदतीस तत्पर - जिल्हा पोलीस अधीक्षक



चाचा नेहरू बाल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचा शुभारंभ

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि. १५, नागपूर :** मुलांनो प्रत्येकाच्या आयुष्यात एक मोठी संधी दडलेली असते. आपल्याला चांगले व्हायचे आहे, चांगलेच कार्य करायचे आहे अशी मनात खुणगाठ बांधा. मोठी स्वप्न पहा. आपणही एक दिवस चांगला व्यक्ती होऊ हे ध्येय डोळ्यासमोर ठेऊन त्याला प्रयत्नांची जोड द्या. तुमच्या मधून पोलीस अधिकारी व्हावेत अशी आमची इच्छा असून त्याच्या पूर्वतयारीसाठी आम्ही तुमच्या सोबत आहोत, असे प्रतिपादन जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. हर्ष पोद्दार यांनी केले. महिला व बालविकास विभाग अंतर्गत नागपूर जिल्ह्यातील शासकीय व स्वयंसेवी संस्थामध्ये पुनर्वसनासाठी दाखल झालेल्या अनाथ, निराधार, उन्मार्गी मुलामुलींच्या क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते.

नागपूर ग्रामीण पोलीस मुख्यालय येथे आयोजित चाचा नेहरु बाल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महिला व बालविकास विभागाच्या विभागीय उपायुक्त अपर्णा कोल्हे, जिल्हा माहिती अधिकारी विनोद रापतवार, बाल कल्याण समितीच्या अध्यक्षा छाया राऊत, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी रणजीत कुऱ्हे, आर्यनमॅन दक्ष खंते आदी उपस्थित होते.इतर मुलांपेक्षा वेगळी आव्हाने तुमच्या समोर आहेत. यावर तुम्ही यशस्वी मात करुन तुमच्यातील कलागुणांची चुणूक सिध्द करुन दाखविली आहे. चांगली खिलाडूवृत्ती तुम्ही बाळगली आहे. वयाची अठरा वर्ष पूर्ण केल्यानंतर अनुरक्षण गृहातील तुमच्या वास्तव्याला कृतीची जोड द्या. तुमची ओळख चांगले खेळाडू म्हणून व्हावी. तुमच्यापैकी चांगले पोलीस अधिकारी व्हावेत यासाठी आवश्यक असणाऱ्या पूर्व प्रशिक्षणाच्या सुविधा तुम्हाला येथे उपलब्ध आहेत. या मुख्यालयातील ग्राऊंडवर तुम्हाला सरावासाठी योग्य त्या सुविधा उपलब्ध करु, असे जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. हर्ष पोद्दार यांनी सांगितले. विपरित परिस्थितीतून मात करीत तुम्ही स्वत:ला सिध्द करण्याची मनीषा व आत्मविश्वास बाळगला आहे. सजग समाजात कोणतीही मुले अनाथ असत नाहीत. तुम्हच्या विकासाची, शिक्षणाची जबाबदारी व पालकत्व शासनाने, महिला व बालविकास विभागाने स्वीकारलेले आहे. समाजातील विविध घटकांनी, सेवाभावी संस्थांनी आपल्यासाठी मदतीचा हात पुढे ठेवला असून मदतीचे हे हात समाजातून आणखी वाढतील असे जिल्हा माहिती अधिकारी विनोद रापतवार यांनी सांगितले.

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी रणजीत कुऱ्हे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. तीन दिवस चालणाऱ्या या क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात एकूण ३५० खेळाडू सहभागी झाले आहेत. ही सर्व मुले व मुली शासकी बालगृह, स्वयंसेवी संस्थांचे बालगृह त्याचप्रमाणे महिला वसतिगृहातील लाभार्थी सहभागी आहेत. यात धावणे, खो-खो, कबड्डी, लांब उडी, गोळाफेक व व्हॉलीबाल क्रीडा स्पर्धांसह कॅरम,चेस, चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा व सांस्कृतिक स्पर्धा घेतल्या जात असल्याची माहिती त्यांनी दिली. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी जिल्हा परिविक्षा अधिकारी चंद्रकांत बोंडे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मुश्ताक पठाण व स्वयंसेवी संस्थांचे पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

## 'डिलिव्हरी बॉय'च्या वेशात घरफोडी, करणाऱ्या चोरट्यासह साथीदार गजाआड



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, पुणे :** घरपोहोच खाद्यपदार्थ पोहचविणाऱ्या कामगाराच्या (डिलिव्हरी बॉय) वेशात सोसायटीतील बंद सदनिकांची पाहणी करुन घरफोडी करणाऱ्या चोरट्याला स्वारगेट पोलिसांनी अटक केली. याप्रकरणात चोरट्याचा साथीदार सराइत गुंड, तसेच सराफ व्यावसायिकाला अटक करण्यात आली असून, चोरट्याकडून ८६० ग्रॅम सोन्याचे दागिने, साडेतीन किलो चांदी, १५० हिरे, दुचाकी, दोन पिस्तुलांसह पाच काडतुसे असा ८० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी गणेश मारुती काठेवाडे (वय ३७, रा. मुखेड, जि. नांदेड), सुरेश बबन पवार (वय ३५, रा. बालाजीनगर, धनकवडी, पुणे-सातारा रस्ता), सराफ व्यावसायिक भीमसिंग उर्फ अजय करणसिंग राजपूत (नथवाला) (वय ३९) यांना अटक करण्यात आली आहे, अशी माहिती परिमंडळ दोनच्या पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली. सहायक आयुक्त राहुल आवारे यावेळी उपस्थित होते. स्वारगेट परिसरात गेल्या महिन्यात १९ डिसेंबर रोजी घरफोडी झाली होती. या गुन्ह्याचा तपास स्वारगेट पोलिसांच्या तपास पथकाकडून करण्यात येत होता.

पोलिसांनी जवळपास १६०० ते १७०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केलेले चित्रीकरण तपासले होते. तपासात एके ठिकाणी चित्रीकरणा गणेश काठेवाडे याची अस्पष्ट छबी आढळून आली होती. तपास पथकातील पोलीस कर्मचारी रफीक नदाफ, शंकर संपत्ते, सागर केकाण, दिनेश भांदुर्गे यांना स्वारगेट भागतील घरफोडी सराइत चोरटा काठेवाडेने केल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने त्याचा माग काढण्यास सुरुवात केली. कोंढवा परिसरातील उंड्री भागातून त्याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने डिलिव्हरी बॉयसारखी वेशभूषा करुन शहरातील विविध सोसायटीतील बंद सदनिकांची पाहणी करुन घरफोडीचे १४ गुन्हे केल्याची माहिती मिळाली.

त्याने स्वारगेट एसटी स्थानकात परिसरात प्रवाशांकडील ऐवज चोरीचे सात गुन्हे केल्याची माहिती तपासात निष्पन्न झाली. चोरलेले दागिने त्याने सराइत गुन्हेगार सुरेश पवार याच्याकडे दिले होते. पवार याच्याविरुद्ध पोलिसांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मोक्का) कारवाई केली होती. या गुन्ह्यात त्याने जामीन मिळवला होता. काठेवाडे दिलेले दागिने पवारने सराफ व्यावसायिक भीमसिंग राजपूत याच्या मध्यस्थीने विक्री केल्याची माहिती तपासात मिळाली.

# संपादकीय



## वाहतूक कोंडीवरील उपाय

पुणे शहरातील वाहतूक व्यवस्था दिवसेंदिवस जटील होत चालली आहे. शहरातील मध्यभाग, उपनगर, पेठांसह बस स्थानक, रेल्वे स्थानक परिसरात प्रचंड वाहतूक कोंडी वाढली आहे. या ठिकाणांहून वाहन चालकांना मार्ग काढणे, आणि नागरिकांना चालणे देखील मुश्किल झाले आहे. पुण्यातील वाहतूक कोंडीने दररोज पुणेकरांना जीव मुठीत धरावा लागत आहे. त्यामुळे पुणेकर अक्षरशः वैतागले असून पुण्यातील या वाहतूक कोंडीत पुणेकरांचा श्वास घुसमटत आहे. पुण्यातील वाहतूक कोंडीवर आता जगाने ही शिक्कामोर्तब केले आहे. टॉम टॉम या जागतिक संस्थेने जगातील ६२ देश आणि ५०० शहरांमधील रहदारीची माहिती संकलन करून ट्रॉफीक इंडेक्स २०२४ नावाचा अहवाल सादर केला. या अहवालात जगातील सर्वाधिक वाहतूक कोंडी असलेल्या शहरांची नावे प्रसिद्ध करण्यात आली आहे. या अहवालात जगातील सर्वाधिक वाहतूक कोंडी असलेल्या पाच शहरांमध्ये कोलाकोता, बेंगळुरू आणि पुणे या शहरांचा समावेश आहे. या अहवालात सर्वाधिक वाहतूक कोंडी असलेल्या शहरात कोलकाता दुसऱ्या तर पुण्याचा चौथा क्रमांक लागत असल्याचे नमूद केले आहे. जगातील सर्वाधिक वाहतूक कोंडी असलेल्या शहरात पुण्याचा चौथा क्रमांक लागतो ही पुणेकरांसाठी भूषणावह बाब नसून चिंताजनक बाब आहे. पुण्यातील वाहतूक कोंडी दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. दहा किलोमीटरच्या प्रवासासाठी पुणेकरांना ३३ मिनिटे २२ सेकंद लागतात. पुणेकरांचा सर्वाधिक वेळ हा प्रवासातच जातो. पुण्यातील वाढत्या वाहतूक कोंडीला अनेक कारणे आहेत त्यातील सर्वात महत्वाचे कारण म्हणजे वाहनांची बेसुमार वाढती संख्या. एकेकाळी सायकलींचे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यात आज लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे दरवर्षी त्यात भरच पडत आहे. वाढत्या वाहनांमुळे रस्ते अपुरे पडत आहे. अरुंद रस्ते आणि त्यावर फोफावलेली अतिक्रमणे यामुळे पुण्यातील वाहतूक कोंडीत भरच पडत आहे. पुण्यातील वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी साधारणपणे एक हजार वाहतूक पोलीस रस्त्यावर असतात. पुणे शहराचा विस्तार मुंबईपेक्षा जास्त आहे. वाहतूक पोलिसांना उपलब्ध मनुष्यबळात काम करावे लागते. वाहतूक कोंडीला पोलिसांना दोषी ठरवले जाते. मात्र यात पोलिसांचा काहीही दोष नाही. पुण्यातील वाहतूक कोंडी रोखायची असेल वाढत्या वाहनांना आळा घालवा लागेल आणि वाढत्या वाहनांना आळा घालायचा असेल तर पुण्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करावी लागेल. जर पुण्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाली तर लोक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचाच वापर करतील त्यामुळे वाढत्या वाहनांना आळा बसेल आणि वाढत्या वाहनांना आळा बसला की वाहतूक कोंडीही कमी होईल आणि वाहतूक कोंडी कमी झाली की पुणेकरांना मोकळा श्वास घेता येईल.

## खेळाडू गौरवाने पुण्यात खाशाबांची १०० वी जयंती साजरी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, पुणे :** भारताचे पहिले वयक्तिक ऑलिम्पिक पदक विजेते मल्ल खाशाबा जाधव यांची १०० वी जयंती बुधवारी (दि.१५) पुण्यात राष्ट्रीय क्राडापटूंचा गौरव करून साजरी करण्यात आली. वारजे येथिल आंतरराष्ट्रीय दर्जाच्या इन्फीनिटी जिम्नॅस्टिक्स हॉलमधील

कार्यक्रमात खाशाबांचे पोस्टर व खाशाबांचे चरित्र पुस्तके भेट देऊन ९ राष्ट्रीय खेळाडूंचा सन्मान करण्यात आला.

आंतरराष्ट्रीय जिम्नॅस्टिक्स प्रशिक्षक अजित जरांडे, लेखक संजय दुधाणे, मानसी करमरकर, प्रवीण भैरवकर, मोहन जरांडे, अभिषेक मोरे यांच्यासह मोठ्या संख्येने खेळाडू उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेचे पूजन अजित जरांडे, संजय दुधाणे यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रा. संजय दुधाणे यांनी खाशाबांच्या आठवणींना उजाळा दिला. १९४८ मध्ये खाशाबा जहाजाचा प्रवास करून लंडन ऑलिम्पिकला गेले होते असे सांगून दुधाणे म्हणाले की, जिद्द, चिकाटी आणि गुरूनिष्ठा असल्याने खाशाबांनी देशासाठी पहिले ऐतिहासिक कांस्यपदक जिंकण्याचा पराक्रम केला. अजीत जरांडे यांनी राज्य क्रीडा दिनाचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मानसी करमरकर यांनी केले.

# वैश्विक समृद्ध समाजाची निर्मिती

विकिपीडिया ही एक डिजिटल प्लॅटफॉर्म असून जगभरातील लोकांना विविध विषयांवरील माहिती उपलब्ध करून देते. याचे वैशिष्ट्य म्हणजे लोक स्वतःच यात लेख संपादित आणि अद्ययावत करू शकतात. यामुळेच विकिपीडिया ज्ञानाचा एक मुक्त स्रोत बनला आहे. आजक विकिपीडिया ३००पेक्षा अधिक भाषांमध्ये उपलब्ध आहे आणि जगभरातील कोट्यवधी लोक या ज्ञानकोशाचा उपयोग करतात. शिक्षण, संशोधन आणि माहितीची देवाणघेवाण यासाठी विकिपीडियाचा उपयोग अमूल्य ठरतो. विकिपीडिया दिन आपल्याला ज्ञानाच्या मुक्त प्रवाहाचे महत्त्व पटवून देतो. यामुळे जगातील प्रत्येकाला शिक्षण आणि माहितीचा सहज आणि विनामूल्य प्रवेश मिळतो, ज्यामुळे जागतिक पातळीवर समृद्ध समाजाची निर्मिती होते.

विकिपीडिया दिवसाचा इतिहास- एक काळ असा होता, जेव्हा विद्यार्थी आणि संशोधकांना एखाद्या विषयाची माहिती मिळवण्यासाठी लायब्ररीतील अनेक पुस्तकांमधून जावे लागत असे. हा तो काळ होता जेव्हा इंटरनेट आजच्या नावीन्यतेच्या शिखरावर पोहोचले नव्हते. तथापि, आपल्याला माहित असलेले जग, जेव्हा हे शोध इंजिन तयार झाले, तेव्हा पूर्णपणे विकसित झाले आणि लोकांना अनेक विषयांवर माहिती देण्यासाठी असंख्य वेबसाइट तयार केल्या गेल्या. यापैकी एक प्रसिद्ध वेबसाइट विकिपीडिया आहे. ज्याला मोफत इंटरनेट विश्वकोश म्हणूनही ओळखले जाते. ना-नफा विकिमीडिया फाउंडेशनच्या देखरेखीखाली, लेखांची निर्मिती आणि विकास सुलभ करण्यासाठी वेबसाइट ओळखली जाते. विकिपीडियाच्या इतिहासाबद्दल येथे थोडे अधिक आहे. सन १९९६मध्ये जिमी वेल्सने बोमिस, इंक. या वेब पोर्टल कंपनीची स्थापना केली तेव्हा हे सर्व सुरू झाले. मार्च २०००पर्यंत, वेल्सने जगासमोर न्यूपीडियाची ओळख करून दिली. हा एक विनामूल्य ऑनलाइन विश्वकोश होता ज्यामध्ये मुख्य संपादक आणि प्रकाशित केलेल्या माहितीचे पुनरावलोकन करणाऱ्या व्यक्तींचा एक संघ होता. सन २००१मध्ये, न्यूपीडियाला विकी सॉफ्टवेअरसह पूरक केले गेले आणि विकिपीडिया हे न्यूपीडिया डॉट कॉमचे वैशिष्ट्य म्हणून लाँच केले गेले. तथापि, अनेक चर्चेनंतर, विकिपीडिया स्वतंत्र वेबसाइट म्हणून पुन्हा सुरू करण्यात आले आणि पहिल्या वर्षात २० हजारहून अधिक लेख प्रकाशित करण्यात यशस्वी झाले! यामध्ये फ्रेंच, जर्मन, पोलिश, डच, हिब्रू, चायनीज आणि एस्पेरांतो अशा १८ वेगवेगळ्या भाषांमधील कामांचा समावेश आहे.



आज, ती जगातील सर्वाधिक भेट दिलेल्या साइट्सपैकी एक बनली आहे आणि तिच्याकडे स्वारस्य असलेल्या जवळजवळ प्रत्येक विषयाशी संबंधित माहिती आहे. तथापि, साइटद्वारे वापरलेल्या योग्य संदर्भांच्या अभावामुळे शाळा आणि विद्यापीठे टर्म पेपरमध्ये विकिपीडिया वापरण्याची परवानगी देत नाहीत.

१५ जानेवारी रोजी विकिपीडिया दिन- या साइटचा जन्म झाला. जगातील जवळजवळ प्रत्येक व्यक्तीला विकिपीडिया काय आहे, हे माहित आहे. जेव्हा आपण काहीतरी शोधतो, तेव्हा विकिपीडिया लिंक ही पहिली असते, जी आपल्या शोध इंजिनवर पॉप अप होते. ही एक लोकप्रिय साइट देखील आहे; कारण ती सखोल माहिती प्रदान करते आणि वापरकर्ता-अनुकूल मार्गाने सर्वकाही सादर करतो. त्यामुळे अधिक त्रास न करता, हा दिवस त्या माहिती प्रदात्याला समर्पित करूया... जो पहिल्या दिवसापासून आपल्याला ज्ञान देत आहे, हे विशेष!

**!! विकिपीडिया दिनाच्या सर्वांना सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!**

**- संकलन व सुलेखन -**
**कृष्णकुमार निकोडे गुरूजी**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सअॅप- ९४२३७१४८८३.**

## डोंबिवली पूर्व येथुन १३ वर्षीय मुलगा बेपत्ता

### अपहरण झाल्याची शक्यता !

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१५, डोंबिवली (ठाणे) :** दि.२३ नोव्हेंबर रोजी डोंबिवली सोनरपाडा येथुन कु. यश पिंटू शर्मा हा बेपत्ता झाला, त्याचा शेवटचा संपर्क सोनारपाडा येथे दिसला असल्याचे वृत्त आहे. मुलाचे वय वर्ष १३ असून रंग सावळा तसेच उंची ४ फूट असल्याचे सांगण्यात आले आहे.

हा मुलगा सोनारपाडा येथील जी आर पाटील शाळेजवळील क्लासला नियमित जात असे पण २३ नोव्हेंबर रोजी त्याने क्लासला जाण्याचे सांगून घर सोडले. मात्र परत न आल्याचे कुटुंबियांकडून सांगण्यात आले मिळालेल्या माहिती नुसार कोणी अज्ञात व्यक्तीने फुस लाऊन अपहरण केल्याची शक्यता वर्तवली जात आहे. सदर मुलाशी संबंधित कुटलीही माहिती असल्यास मानपाडा पोलीस ठाण्याला संपर्क साधावा असे सांगण्यात आले आहे.

### परिश्रम..

शोधून काढे आरोपी
सतत करुन परिश्रम
तपासयंत्रणा स्वताचं
कारावास भोगेसश्रम

तपासआणि प्रगतीत
नेहमीअसतो व्युत्क्रम
एकाच्याराशीतून करे
दुस-या राशीत संक्रम

रोजकरावी भागदौड
पोलीसां हा दिनक्रम
कुठल्या केसलेमहत्व
बदलत जाई अनुक्रम

दोषीम्हणून पकडला
सोडा सुस्कारा उश्रम
कोण मूळचा सूत्रधार
जनते पसरतो संभ्रम

दोन्ही बाजूंनी सारखे
बडवत बसावे मृदंगम्
धरले आरोपी सांगता
दृश्य दाखवा विहंगम्

पकडा न् डांबून ठेवा
जेल होई अनाथाश्रम
लोंबकळत राही केस
जेल बनतो वृध्दाश्रम

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी


# राज्यात गुटखाबंदी आहे का ?

एकेकाळी दुर्मिळ म्हटला जाणारा कर्करोग आज भारतात झपाट्याने वाढतो आहे. भारतात कर्करोगाने ग्रस्त रुग्णांपैकी ३० टक्केहून अधिक रुग्ण हे मुखाच्या कर्करोगाने ग्रस्त असतात. देशात जलदगतीने वाढत जाणारा मुखाचा कर्करोग रोखणे वैद्यकशास्त्रासमोरील आज मोठे आव्हान बनले आहे. गुटखा, तंबाखू यांचे नियमित सेवन हे या रोगाचे प्रमुख कारण आहे. देशातील झपाट्याने वाढणाऱ्या रुग्णांची संख्या लक्षात घेऊन देशातील २६ राज्यांनी आणि पाच केंद्रशासित प्रदेशांनी गुटखाबंदी लागू केली आहे. असे असताना गुटखाबंदी करणाऱ्या सर्वच राज्यांत आज गुटखा सहज उपलब्ध होतो आहे. यावरूनच आपल्या देशात भ्रष्टाचार किती खोल रुजला आहे हे लक्षात येईल. महाराष्ट्रात २०१२ साली गुटखाबंदी लागू करण्यात आली. आजमितीला ही गुटखाबंदी केवळ कागदावरच असल्याचे चित्र दिसत आहे. शहरी भागात पानाच्या लहान मोठ्या टपऱ्यांवर, किराणा मालाच्या छोट्या दुकानांमध्ये आज सर्रासपणे गुटखा विकला जात आहे. शाळा महाविद्यालय परिसरातील टपऱ्यांवरही गुटखा सहज उपलब्ध होत असल्याने शाळकरी मुले आणि महाविद्यालयीन तरुण गुटख्याच्या आहारी जाऊ लागली आहेत. फरक एवढाच असतो कि अशा ठिकाणी गुटख्याची पाकिटे या टपऱ्यांवर दर्शनी भागात मांडली जात नाहीत; मात्र मागणी केल्यावर हवी तितकी पाकिटे उपलब्ध करून दिली जातात. कोरोनाकाळात जिथे जीवनावश्यक वस्तू मिळणे मुश्किल होते अशा भागांत गुटख्याची पाकिटे चढ्या दराने विकली जात होती. अनेक ठिकाणी स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने पान टपऱ्यांवर दर्शनी भागात चिप्सच्या पाकिटांप्रमाणे विविध कंपन्यांची गुटख्याची पाकिटे लटकवलेली दिसून येतात. गावांमध्ये रेल्वेच्या पॅसेंजर गाड्या थांबतात तेव्हा जवळच्या परिसरातील तरुण गुटखा, सिगारेट आणि तंबाखूची पाकिटे विकण्यासाठी गाडीत बिनधास्तपणे फिरतात. प्रवासीसुद्धा यांच्याकडून मोठ्या प्रमाणात खरेदी करतात. अन्न व औषध प्रशासनातील भ्रष्ट अधिकारी आणि भ्रष्ट पोलीस यंत्रणा यांमुळे राज्यभर गुटखा पुरवण्याचे छुपे जाळे निर्माण झाले आहे. दरवर्षी विविध ठिकाणी धाडी टाकुन कोट्यवधीचा गुटखा जप्त केला जातो; मात्र ही कारवाई केवळ दाखवण्यापुरती असते असे अनेक सुजाण नागरिकांचे मत आहे. आजमितीला विविध वाहिन्यांवर, युट्युबवर गुटख्याच्या जाहिराती प्रसारित केल्या जातात ज्यामध्ये उल्लेख पान मसाल्याचा केला जात असला तरी या जाहिराती गुटख्याच्या असतात हे सर्वांनाच ज्ञात आहे. नामवंत कलाकार मंडळी, खेळाडू या जाहिरातींच्या माध्यमातून नागरिकांना गुटखा खाण्याचे आवाहन करताना दिसतात. एकेकाळी गुटखा हा झोपडपट्ट्यांतून, मध्यमवर्गीयांच्या वस्तींमध्ये मोठ्या प्रमाणात विकला जात असे; मात्र अशा जाहिरातीमुळे आज गुटख्यालाही 'रॉयल स्टेटस' प्राप्त झाले आहे. सुशिक्षित आणि श्रीमंतांमध्येही गुटखा खाल्ला जाऊ लागला आहे. एका बाजूने राज्यात गुटखाबंदी करण्यात आली आहे, त्यासाठी शिक्षेचे आणि दंडाचे प्रावधानही करण्यात आले आहे आणि दुसऱ्या बाजूने तरुणांचे रोल मॉडेल असणाऱ्या सिनेकलाकारांना आणि खेळाडूंना घेऊन विविध कंपन्यांच्या गुटख्याची जाहिरातबाजी चालू आहे. गावागावांतून गुटखा पुरवला जात आहे, टपऱ्यांवर सहज उपलब्ध करून दिला जात आहे. हा विरोधाभास नेमके काय दर्शवतो ? गुटख्याच्या निर्मिती आणि वितरणाबाबत कायदा करण्यात आला आहे; मात्र त्याची अंमलबजावणी करण्याची भिस्त ज्यांच्यावर आहे ती पोलीस यंत्रणाच या कायद्याला धाब्यावर बसवणाऱ्यांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करत आहेत. आज काही पोलिसांसह राजकीय नेतेमंडळीही सार्वजनिक ठिकाणी गुटखा चघळताना दिसतात, त्यामुळे राज्यात खरेच गुटखाबंदी आहे का ? हा प्रश्न कोणालाही पडल्यावाचून राहत नाही.



**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# वाचक पत्र



## मकर संक्रातीच्या तोंडावर जिहाद्यांचे विकृत कृत्य !

देशातील विविध भागांत मकर संक्रांत विविध प्रकारे साजरी केली जाते. कर्नाटकात या दिवशी गोपूजन केले जाते. आपल्या गोठ्यातील गाईंना आणि बैलांना आंघोळ घालून हळदीच्या ठिपक्यांनी आणि रेषांनी सजवले जाते. मात्र हिंदूंच्या सण उत्सवांत सातत्याने खोडा घालून आपल्या विकृत जिहादी मानसिकतेचे दर्शन घडवणाऱ्या समाजद्रोही मंडळींनी कर्नाटकची राजधानी असलेल्या बंगळुरूमधील चामराजपेट परिसरात पशुलाही लाजवेल असे कृत्य केले. शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास परिसरातील तीन गाईंवर हल्ला करून काही नतद्रष्टयांनी त्यांचे स्तन कापून टाकले. गुरांच्या वेदनादायक किंकाळ्यांनी स्थानिक नागरिक जागे झाले असता तीन गाई रक्ताने माखलेल्या अवस्थेत दिसल्या. मकर संक्रांत तोंडावर आली असताना घडलेल्या या घृणास्पद कृत्यामुळे नागरिकांत संतापाची लाट उलटली असून काँग्रेसची सत्ता असलेल्या कर्नाटकात हिंदूंसह हिंदूंची श्धदास्थानेही सुरक्षित नसल्याची टीका भाजपकडून केली जात आहे. संक्रांतीच्या निमित्ताने हिंदू गाईंचे पूजन करत असल्यानेच जिहाद्यांनी गाईंना लक्ष केल्याचे म्हटले जात आहे. गेल्या काही वर्षांमध्ये देशातील काही भागांत सार्वजानिक गणेशोत्सव, नवरात्री उत्सव, शिवजयंती उत्सव यांदरम्यान मंडपांवर दगडफेक लेली जाते. मिरणुकांत विघ्न आणण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे अशा ठिकाणी हिंदूंचे उत्सव दरवर्षी दहशतीच्या वातावरणांत साजरे होतात. या सर्वांचा ताण तेथील सुरक्षा व्यवस्थांवर होत असतो. प्रयागराज येथे पार पडत असलेल्या महाकुंभात दहशतवादी हल्ला करून १००० हिंदूंना ठार मारण्याची धमकी देण्यापर्यंतची मजल या जिहाद्यांची गेली आहे. पंथनिरपेक्ष भारतात जिहादी मानसिकता बाळगणाऱ्या विघ्नसंतोषी समाजद्रोह्यांनी मकर संक्रांतीच्या तोंडावर गाईंचे स्तन कापून परिसरात दहशत माजवण्याचा प्रयत्न केला आहे. जिहाद्यांच्या या मुजोरीवर केन्द्रीय सुरक्षा यंत्रणा काही ठोस उपाययोजना करणार आहे कि नाही ? हिंदूंनी आणखी किती दिवस सण उत्सव दहशतीच्या वातावरणात साजरे करायचे ?

**- सौ.मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## फुटबॉलपटू राबिया शेख चा आयुक्तांनी केला सत्कार



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१५, नवी मुंबई :** महानगरपालिका शाळा क्र.३६, कोपरखैरणेगाव येथील माजी विद्यार्थिनी कु. राबिया सागर शेख हिची 'इंडिया खेलो फुटबॉल लीग - २०२५ (आयकेएफ- ४)' साठी पश्चिम विभागाकडून संघाची कर्णधार म्हणून नुकतीच निवड झाली आहे. ही बाब नवी मुंबई महापालिकेसाठी अत्यंत अभिमानास्पद व गौरवास्पद आहे. या अनुषंगाने पालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी तिचे अभिनंदन करीत स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, शिक्षण विभागाच्या उपायुक्त संघरत्ना खिल्लारे, शिक्षण अधिकारी अरुणा यादव, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव उपस्थित होते.

राबिया शेख हिने यापूर्वीही विविध स्पर्धांमध्ये उज्ज्वल यश संपादन केले आहे. यामध्ये - (१) सुब्रतो रॉय फुटबॉल कप - उपविजेतेपद, (२) डीएसओ फुटबॉल स्पर्धा - विजेतेपद, (३) मुंबई फुटबॉल लीग - विजेतेपद, (४) टीएफसी ठाणे फुटबॉल लीग - विजेतेपद - अशा अनेक स्पर्धांचा समावेश आहे. तिला फुटबॉल प्रशिक्षक रोहन जगताप, ज्ञानेश्वर घुगे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले आहे. तसेच संघ व्यवस्थापक योगेश सुर्वे, कुणाल कोषटवार, अश्विनी सावले यांचेही वैयक्तिक मार्गदर्शन लाभले आहे. नवी मुंबई महानगरपालिकेचे क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव व शिक्षक प्रशांत गाडेकर यांचेही उत्तम सहकार्य व मार्गदर्शन मिळाले आहे. नमुंमपा शाळा क्रमांक ३६ कोपरखैरणे गाव येथील विद्यार्थ्यांसाठी राबियाने प्रेरणादायी कामगिरी केली असून तिचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

## दिव्यांगांना कृत्रिम साधने वितरण करण्यासाठी तपासणी शिबीराचे उद्घाटन संपन्न



**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.१५, जव्हार (पालघर) :** दिव्यांगांना कृत्रिम साधने वितरण करण्यासाठी तपासणी शिबीराचे उद्घाटन संपन्न झाले. जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, पालघर अंम लबजावणी संस्था सक्षम, नागपूर, दिव्य विद्यालय जव्हार, अलीमको भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. यांच्या सहकार्याने पालघर जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींना मोटाराईज्ड सायकल, ट्रायसाईकल, स्मार्ट फोन, अंधाची काठी, कानाचे मशीन इत्यादी साहित्य मोफत वितरण करण्याकरिता तपासणी शिबीराचे आयोजन दि. १५,१६,१७ जानेवारी २०२५ रोजी दिव्य विद्यालय, नाशीक रोड जव्हार येथे करण्यात आले आहे. या शिबीराचे उद्घाटन पंचायत समितीच्या सभापती विजया लहारे, गट विकास अधिकारी चित्तेजी, माजी सभापती तथा राज्य महिला आयोगाच्या सदस्या ज्योती भोये, प्रमिला कोकड जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे व्यंकट लामजणे, केशवसृष्टीचे डॉ.सुरेश सरवडेकर यांच्या हस्ते झाले. दिव्यांगांसाठीच्या शिबीरामध्ये जास्तीत जास्त दिव्यांगांना सहभागी होऊन तपासणी करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सभापती विजया लहारे यांनी प्रतिपादन केले. गटविकास अधिकारी चित्ते जी यांनी जव्हार तालुक्यातील सर्व ग्रामसेवक यांची बैठक घेऊन गावातील सर्व दिव्यांगांना शिबीराचा लाभ देणार असल्याचे सांगितले. माजी सभापती ज्योती भोये यांनी दिव्यांगांसाठी दिव्यांग प्रमाणपत्र काढण्यासाठी शिबीर आयोजन करण्याबाबत सुचविले. जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे व्यंकट लामजणे यांनी दिव्यांगांना मोफत कृत्रिम साहित्य वितरीत करण्यात येणार असल्याचे सांगितले तसेच दिव्यांगांसाठी यु डी आय डी कार्डचे शिबीर आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगितले. दिव्य विद्यालयाच्या संचालकप्रमिला कोकड यांनी दिव्य शाळेची माहिती उपस्थितांना दिली. व सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाचे संचालन शर्मिला पिलाना यांनी केले. शिबीरासाठी अलिमको भारत सरकारकडून डॉ.चंद्रा, डॉ.रितु यांनी दिव्यांगांची तपासणी केली. शिबीराकरिता मुख्याध्यापक विलास चव्हाण यांच्यासह शिक्षक, कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## विंचूरला नायलॉन मांजामुळे तरुणाचा गळा चिरला

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१५, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथे मकर संक्रांत उत्सव सुरू असताना मकर संक्रांतीच्या आदल्या दिवशी नायलॉन मांजा गळ्याला अडकल्याने गंभीर दुखापत होऊन तरुणाचा गळा चिरल्याने तब्बल ४१ टाके पडले आहे. मकरसंक्रांतीच्या पूर्वसंध्येला लासलगाव-विंचूर रस्त्यावरील होळकर वेशीजवळ घटना घडली होती. बहिणीला भेटण्यासाठी जात असलेल्या रेहान शेख (१६) या तरुणाच्या गळ्याला मांजा अडकल्याने गळा खोलवर चिरला गेला. तातडीने त्याला लासलगांव येथे रुग्णालयात दाखल करून वेळीच ताबडतोब उपचार झाल्याने तरुणाचे प्राण वाचले आहे. तरुणाच्या मानेच्या नसला मोठी दुखापत झाली होती. परंतु त्या ठिकाणी डॉक्टर उपस्थित होते. त्यामुळे लवकर इलाज होऊ शकला. नायलॉन मांजा विक्री बंद असताना तो विक्री होत असल्याने नागरिकांमध्ये त्रिव नाराजी होती. या घटनेचे पडसाद पूर्ण विंचूर शहरात उमटल्याने विंचूर शहरात नायलॉन मांजा वापरू नका अशी मोहीम सुरु झाली होती. परिसरातील तरुणांनी याला पाठिंबा देत, विंचूर येथील बजरंग मंडळामध्ये तरुणांनी नायलॉन मांजा कात्रीने कापून नायलान मांजा वापरू नका असे आवाहन केले होते.

## पसायदान अनाथाश्रमाला शैक्षणिक साहित्य वाटप



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, सानपाडा (नवी मुंबई) :** सुरक्षा रक्षक मंडळ, सानपाडा आस्थापना लोढा सुप्रीमस २ ठाणे मधील सुरक्षा रक्षक यांची पसायदान अनाथाश्रम खडवली येथे भेट घेऊन तेथील मुलांना नुकतेच शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. सोबत खाऊ, खोबरेल तेल इ. देऊन त्यांच्या सोबत गाणी, कविता बोलण्याचा, ऐकण्याचा योग आला. सुरक्षा रक्षक टीम तसेच सुधीर शेंडगे, गणेश मोरे, दिनेश जाधव, अंकुश व्हटकर, मोहन जाधव, गोरख घारे, अरुण रणशुर व सुरक्षा पर्यवेक्षक -संतोष म्हाडेश्वर यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. प्रत्यक्ष अप्रत्यक्ष ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.'

# नारायणगाव पोलीस ठाण्याने अवैध धंद्यावर कारवाई करून ३ लाख १७ हजार रुपयांचा दंड केला वसूल

**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.१५, नारायणगाव (पुणे) :** नारायणगाव पोलीस ठाण्यामध्ये कार्यरत असलेल्या निर्भया पथकाने पोलीस ठाणे हद्दीमधील वारूळवाडी येथील म्युझिक कॅफे व नारायणगाव येथील कॅफे कॅपिटल नावाच्या दोन अवैद्य कॅफेमध्ये शालेय मुले मुली अश्लील चाळे करताना मिळून आल्याने सदर कॅफे चालकांवर नारायणगाव पोलीस स्टेशनमध्ये कारवाई करण्यात आली आहे. तसेच धनगरवाडी येथील नक्षत्र लॉज रजिस्टर मेंटेन नसल्याच्या कारणावरून लॉज चालकावर नारायणगाव निर्भया पथकाने कारवाई करून नारायणगाव पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे.




नारायणगाव पोलीस ठाणे हद्दीमधील सर्व लॉजिंग/रिसॉर्ट चालक- मालक यांची नारायणगाव पोलीस स्टेशन येथे काल मीटिंग घेऊन सदर लॉजिंग/रिसॉर्ट चालविताना हॉटेल/लॉजिंग मध्ये कोणताही अवैध व्यवसाय चालणार नाही. अल्पवयीन मुलांना प्रवेश देणार नाहीत, येणाऱ्या प्रत्येक कस्टमरचे रेकॉर्ड मेंटेन करावे, प्रत्येक हॉटेल लॉजमध्ये सीसीटीव्ही बसवावेत अशा प्रकारच्या सूचनांची नोटीस देण्यात आल्या आहेत.

तसेच निर्भया पथकामार्फत नारायणगाव वारूळवाडी परिसरात शाळा व कॉलेज असलेल्या ठिकाणी २२५ रोड रोमियोंवरती मोटरवाहन कायद्याअंतर्गत कारवाई करत त्यांच्याकडून ३ लाख १७ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. नारायणगाव व आजूबाजूच्या नागरिकांना देखील पर जिल्ह्यातून व परराज्यातून आलेल्या भाडेकरूंची माहिती तात्काळ पोलीस स्टेशनला देण्याबाबत नागरिकांना आव्हान करण्यात आलेले आहे.

# अतिट सरपंच रुपाली अंकुश जाधव यांचा चौफेर विकास कामांचा चढता आलेख

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१५, खंडाळा (सातारा) :** खंडाळा तालुक्यातील पश्चिम भागात डोंगर रांगेत वसलेले अतिट हे अंदाजे १४१३ लोकसंख्या,१२६४ हेक्टर क्षेत्रफळ व २८८ कुटुंब असलेलं अत्यंत शांतताप्रिय गाव. गेल्या काही वर्षात गावच्या सर्वांगीण विकासाला सरपंच रुपाली अंकुश जाधव यांच्या माध्यमातून जोरदार चालना मिळाल्याचे दिसत आहे.



सरपंच रुपाली अंकुश जाधव यांनी अतिट गावच्या सर्वांगीण विकासकामावर भर देत पुढील काही ठळक कामे करत अतिट गावच्या विकासात आपले मोलाचे योगदान दिल्याचे दिसत आहे. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापण, एकात्मिक कृषी विकास प्रकल्प, एकात्मिक घनकचरा प्रकल्प,जलतारा प्रकल्प,जुन्या जलस्रोतांचे पुनर्जीवन, अमेरिकन फंड, (ऋठअ) बांबू लागवड, सौर ऊर्जा, आरोग्य, शिक्षण, कृषी विभाग, पशुसंवर्धन विभाग, उपजीविका, महिला बचत गट, आमदार फंड, खाजदार फंड

**१४ वा, १५ वा वित्त आयोग यामध्यमातून केलेली काही ठळक कामे -**

एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन -एशियन पेंट्स ली.खंडाळा यांच्या सी. एस.आर.निधीतून आणि वनराई संस्था पुणे यांच्या तांत्रिक मार्गदर्शनातून अतिट मध्ये एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन प्रकल्प राबविण्यात आला. यामध्ये १२ माती बांधाऱ्यांचे खोलीकरण करणे, गाळ काढणे, लिकेज काढणे, ८ हजार घनमीटर सलग संतर चार काढणे, ५१ दगडी बंध घालने, २० गलिप्लग करणे, ४ वनराई बंधारे बंधने,२ सिमेंट बंधारे बंधने,२किलोमीटर जल शोषक चार काढणे,३२५ शेतकऱ्यांची दगडी सांडवे (दारीं ) घालणे.जुना कोल्हापुरी बंधारा गेट बसविणे,८ हजार फळ रोपे वाटप. पेरू, आंबा, जांभूळ, लिंबू, बांबू इत्यादी.

**एकात्मिक कृषी विकास प्रकल्प -**

गोदरेज एंटरिओ प्रा. ली. शिरवळ यांच्या सी.एस.आर.निधीतून आणि अवॉर्ड संस्था सातारा यांच्या तांत्रिक मार्गदर्शनातून अतिट मध्ये एकात्मिक कृषी विकास प्रकल्प रबविण्यात आला. यामध्ये सखी महिला समूह अतिट यांना कुकूट पालन शेड १ हजार गावरान कोंबड्यांचे शेड उभरून देण्यात आले.महिला बचत गटातील ३० लाभार्थ्यांना ५० कोंबडी, खाद्य भांडी, पाणी भांडी, खाद्य देण्यात आले. तसेच जनावरांसाठी चारा व कुट्टीमशीन देण्यात आले. तसेच गावाला फिल्टर प्लांट देण्यात आला. महिला साक्षमिकरण करण्यास यामुळे मदत झाली.

**जलतारा प्रकल्प -**

एसीएन पेंट्स ली. खंडाळा यांच्या सी एस आर निधीतून आणि वनराई संस्था पुणे यांच्या तांत्रिक मार्गदर्शनातून अतिट मध्ये जलतारा प्रकल्प मोठया प्रमाणात राबविण्यात आला.यामध्ये ४÷४÷५ फुटाचे ४३० खड्डे घेण्यात आले.यामुळे गावातील पाणीपुरवठा व शेत विहिरीसह भुगार्भातील पाणीसाठ्यात वाढ होण्यास मदत होणार आहे.जुन्या जलस्रोतांचे पुनर्जीवन निप्रो प्रा. ली. खंडाळा यांच्या सी एस आर निधीतून आणि वनराई संस्था पुणे यांच्या तांत्रिक मार्गदर्शनातून अतिट मध्ये ६ जुन्या माती बांधाऱ्यांचे खोलीकरण, गाळ काढणे व शेतकऱ्यांच्या शेतात टाकणे, रुंदीकरण करणे इत्यादी भरीव कामे करण्यात आलीत.

**अमेरिकन फंड -**

ग्रामपंचायतच्या मागणीवरून (ऋठअ ) फॉरेन फंडातून २ बांधाऱ्यांचे लिकेज काढणे व १ नवीन सिमेंट बंधारा बांधण्यात आला आहे.

**एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प -**

ए.सी.जी केअर्स फौंडेशन मुंबई यांच्या सी. एस. आर निधीतून आणि इनोरा.नो हाऊ फौंडेशन पुणे यांच्या तांत्रिक मार्गदर्शनातून एकात्मिक घनकचरा प्रकल्प चालू असून यामध्ये ३५० कुटुंबांना लाभ झाला आहे,यामुळे अतिट गाव स्वच्छ, सुंदर व निरोगी ठेवण्यासाठी मदत झाली आहे.

**सौर ऊर्जा -**

टी ई कनेक्टिव्हिटी शिरवळ यांच्या सी.एस.आर निधीतून व सेलको सोलर लाईट पुणे यांच्या तांत्रिक मार्गदर्शनातून अतिट गावामध्ये १०० कुटुंबाना होम लाईट बसवून मिळाल्या आहेत.

**टॉयलेट युनिट -**

देसाई ब्रदर्स यांच्या सी.एस. आर.निधीतून आणि वनराई संस्था पुणे यांच्या तांत्रिक मार्गदर्शनातून अतिट गावात ३१ कुटुंबाना टॉयलेट युनिट बांधून दिले आहे.

**जि.प.प्रा.शाळा अतिट यांना आरोह प्लांट -**

डेट व्हायलर प्रा. लि. खंडाळा यांच्या सहकार्यातून जि. प. प्रा. शाळा अतिट येथील शाळेसाठी पिण्याचे पाणी शुद्ध मिळावे यासाठी जलशुद्धीकरण प्लांट बसवून दिला आहे.

**ज्ञानसंवर्धिनी हायस्कूल अतिट पिण्याचे पाणी थंड मिळावं यासाठी कुलर -**

इनफाईट सोलुशन प्रा. ली. मुंबई यांच्या सी.एस.आर.निधीतून आणि वनराई संस्था पुणे यांच्या सहकार्यातून शाळेसाठी पाणी थंड उपलब्ध व्हावे यासाठी पिण्याचा पाण्याचा कुलर बसवण्यात आला आहे.

**जि.प.प्रा.शाळा जाधव वस्ती अतिट पूर्ण कलर काम -**

पराजपे प्रा. ली.खंडाळा यांच्या सहकार्यातून जि. प. प्रा.शाळा अतिट जाधव वस्ती शाळेचे पूर्ण कलर काम करून देण्यात आले.

**आरोग्य विभाग उपकेंद्र अतिट पूर्ण सोलर सिस्टीम -**

टी ई कनेक्टिव्हिटी शिरवळ यांच्या सी.एस.आर.निधीतून आणि सेलको सोलर लाईट पुणे यांच्या तांत्रिक मार्गदर्शनातून उपकेंद्र अतिट पूर्ण सोलर करून देण्यात आले आहे.

**एकात्मिक कृषी विकास प्रकल्प -**

एसीएन पेंट्स प्रा. ली. खंडाळा यांच्या सी.एस.आर.निधीतून आणि वनराई संस्था पुणे यांच्या तांत्रिक मार्गदर्शनातून अतिट गावामध्ये एकात्मिक कृषी विकास प्रकल्प राबविण्यात येत आहे. यामध्ये शेतकऱ्यांचे उत्पन्नात वाढ होण्यासाठी डेमो प्लॉट घेणे, महिला साक्षमिकरणासाठी रोपवाटीकासाठी मदत करणे, हायड्रोपोनिक भाजीपाला युनिट देणे, सेंद्रिय शेती ला प्रोत्साहन देणे असे उपक्रम राबविण्यात आले आहेत.

**शासकीय योजना राबविणे -**

कृषिविभाग खंडाळा व जि.प.कृषी विभाग सातारा यांच्या माध्यमातून विविध योजनाचा लाभ शेतकऱ्यांना मिळवून देण्यात आला. यामध्ये गट शेती, सेंद्रिय शेती, महिला समूह, बांबू लागवड, रोजगार हमी योजना, इत्यादी योजनाचा लाभ गावातील लोकांना मिळवून दिला आहे. तसेच फुलांचे गाव करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहे.

**पशुसंवर्धन विभाग खंडाळा -**

या विभागामार्फत पशुपालकांना मोफत औषधे, विविध शिबिराचे आयोजन केले गेले.

**महा आरोग्य शिबीर -**

ग्रामपंचायत अतिट व मानसी मेमोरीयल हॉस्पिटल खंडाळा यांच्या संयुक्त विद्यमानातून महाआरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये महात्मा ज्योतिबा फुले यामधील सर्व योजना, मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी यामधील सर्व योजनाचा लाभ लाभार्थी यांना मिळवून देण्यात आला असून सर्व तपासन्या मोफत करण्यात येतात तसेच विविध प्रकारची ऑपरेशन्स विविध मोफत योजनेतून करण्यात येतात.

**जि.प.प्रा.शाळा अतिट मुलींसाठी स्वतंत्र टॉयलेट युनिट -**

अतिट ग्रामपंचायतीच्या मागणीवरून एसीएन पेंट्स प्रा. ली. खंडाळा यांच्या सी.एस. आर. निधीतून आणि जनसेवा चॅरिटेबल सेंटर संस्था पुणे यांच्या सहकार्यातून आणि तांत्रिक मार्गदर्शनातून जि. प. प्रा. शाळा अतिट मधील मुलींसाठी स्वतंत्र टॉयलेट युनिट बांधून पूर्ण केले आहे. फिरता दवाखाना एसीएन पेंट्स ली. खंडाळा यांच्या सी.एस.आर.निधीतून आणि अपोलो नेटवर्किंग संस्था हैद्राबाद यांच्या तांत्रिक मार्गदर्शनातून प्रत्येक सोमवारी फिरता दवाखाना सुरु करण्यात आला असून यामध्ये सर्व प्रकारची औषधे मोफत वाटप केली जातात.व मोफत तपासन्या केल्या जातात.

**आमदार फंड -**

आमदार फंडाच्या माध्यमातून कॉक्रिटिकरण रस्ते, डांबरीकरण रस्ते, सांभामंडप, सभागृह, साकावं, सिमेंट बंधारे, माती बांधाऱ्यांचे लिकेज काढणं, स्मशानभूमी इत्यादी साठी निधी उपलब्ध झाला.जवळपास ७ कोटी रुपये निधी उपलब्ध झाला.

**खासदार फंड -**

कॉक्रिटिकरण रस्ते, पाणंद रस्ते विकास इत्यादी.

**१३ वा, १४ वा, १५ वा वित्त आयोग ग्रामपंचायत निधीतून -**

बंदिस्त गटरे, रस्ते, स्मशान भूमी सुधारणा, खेळाचे साहित्य वाटप करण्यात आले आहे. संरक्षण भिंत,शाळा सुधारणा आरोग्य विभाग उपकेंद्र अतिट पेवर ब्लॉक बसाविणे, कॉम्प्युटर, प्रिंटर, उपालब्ध करून देण इत्यादी. वर हा निधी खर्च करण्यात आला आहे.

**बांबूचे गाव करण्यासाठी प्रयत्न -**

अतिट गावामध्ये १५० हे.वर बांबू लावण्याचा संकल्प केला आहे. यामध्ये सामाजिक वनिकरण खंडाळा, व पंचायत समिती खंडाळा व कृषिविभाग खंडाळा यांच्या मार्गदर्शनाखाली २० हे वर लागवड झालेली आहे व २५ हे. चे प्रस्ताव तयार करून पाठवले आहेत. येणाऱ्या काळत अतिट हे बांबूचे गाव म्हणून ओळखले जावे म्हणून प्रयत्नशील आहेत.

**फुलाचे गाव करण्यासाठी प्रयत्न -**

जि.प.कृषिविभाग सातारा व पंचायत समिती खंडाळा यांच्या विशेष प्रयत्नातून कृषी विकास प्रकल्प मंजूर झाला असून त्यामध्ये शेतकऱ्यांना विविध फुले करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे. (शेवंती, गलांडा, बिजली, झेंडू, गुलाब, अस्टर, असे विविध फुले यांसाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे. त्यामुळे फुलांचे गाव करण्यासाठी प्रयत्न सुरु असून त्याचा गावातील शेतकऱ्यांना निश्चित फायदा होणार आहे.

**इतर फंड -**

इतर फडातून रस्ते, संरक्षण भिंत, कॉक्रिटिकरण रस्ते, ब्लॉक बसविणे अशी लोकोपयोगी कामे करण्यात आली आहेत.

**खेळाचे मैदान विकसित करणे -**

गावातील मुलांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी मुलांना खेळाचे मैदान उपलब्ध नसल्याने ग्रामपंचायत अतिट च्या नावे मुलकी पड मधील गट न.१२३५ मधील १ हेक्टर क्षेत्र खेळाचे मैदान म्हणून विकसित करणे यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदने दिले असून त्या अनुषंगाने पुढील कार्यवाहीसाठी पाठपुरावा सुरु असून लवकरच यश मिळेल अशी आशा आहे. अशा प्रकारे सरपंच रुपाली अंकुश जाधव यांच्याकडून सर्वांगीण विकासाची विविध काम झाले असल्याचे दिसत आहे. तसेच आणखी काही कामे प्रगती पथावर असल्याचे दिसत आहे. एका महिला सरपंचांचा विकास कामांचा चढता आलेख अनेकांसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल यात शंका नाही.

# स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त चित्रकला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.१५, मुंबई :** माझी मुंबई या संकल्पनेवर आधारित मुंबई महापौर आयोजित बालचित्रकला स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, हिंदू हृदय सम्राट शिवसेनाप्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी जानेवारी महिन्याच्या दुसऱ्या रविवारी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने बालचित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात येते.



दरवर्षीप्रमाणे याही वर्षी वरळीच्या जी/दक्षिण विभागातील महापालिका शाळा व खाजगी शाळेतील एकूण २ हजार विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. चार गटात घेण्यात आलेल्या या चित्रकला स्पर्धेत पहिल्या गटासाठी मी आणि फुलपाखरू, मी आजीच्या कुशीत, मी व माझा मित्र मैत्रिण या विषयावर तर दुसऱ्या गटासाठी आम्ही पतंग उडवितो, आम्ही अभ्यास करतो, आम्ही राणीच्या बागेत या विषयावर आणि तिसऱ्या गटासाठी आमच्या शाळेची परसबाग, आम्ही चौपाटीवर वाळूचा किल्ला बनवितो, आम्ही गणपती मिरवणुकीत नाचतो या विषयांवर तर चौथ्या गटासाठी आमचे महानगर मुंबई, महिला सशक्तीकरण आणि जलसंवर्धन या विषयांवर चित्र काढून त्यात रंग भरायचे होते.

यातील गटनिहाय प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थांना रुपये २५ हजार व प्रमाणपत्र तर द्वितीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांला रुपये २० हजार आणि तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांला रुपये १५ हजारांचे बक्षीस मिळणार आहे. शिवाय महापालिकेच्या २५ विभागातून १०-१० विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५०० रुपये रोख बक्षीस देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

जी दक्षिण विभागातील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मनोरंजन उद्यान वरळी येथे सातशे विद्यार्थी, कामगार मैदान करी रोड येथे सहाशे विद्यार्थी तर तथागत गौतम बुद्ध उद्यान वरळी सी फेस येथे ७०० विद्यार्थी असे तिन्ही मैदानावर एकूण २ हजार विद्यार्थ्यांनी

उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.

जी/दक्षिण विभागाच्या प्रशासकीय अधिकारी वर्षा गांगुर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शाळांचे मुख्याध्यापक, वरीष्ठ शिक्षक, प्रशिक्षित शिक्षक आणि स्पेशल शिक्षक यांनी अतिशय चोख व्यवस्था पार पाडली.

चित्रकला केंद्र प्रमुख पूनम वाघमोडे, आकाशानंद हिरवे आणि संदीप भिवसाने यांनी स्पर्धेचे उत्तम नियोजन केले होते. स्पर्धा केंद्रावर प्रशासकीय अधिकारी वर्षा गांगुर्डे आणि शा शि चे कनिष्ठ पर्यवेक्षक अंकुशराव बागल यांनी प्रत्यक्ष भेट दिली आणि स्पर्धा केंद्राचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांना स्पर्धास्थळी खाऊ व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. विभागातील सर्व शिक्षक, चतुर्थश्रेणी कर्मचारी, बी.व्ही.जी कंपनीचे कर्मचारी यांनी स्पर्धा यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

# आता माता मृत्यू किंवा बालमृत्यू होणार नाही - राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर

**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.१९, जव्हार (पालघर) :** जिल्ह्यात गेल्या काही महिन्यात झालेले बालमृत्यू आणि माता मृत्यू या घटना दुर्दैवी असून यापुढे एक ही माता मृत्यू किंवा बालमृत्यू होणार नाही. यासाठी ठोस कार्यक्रम आखण्यात येईल असे प्रतिपादन राज्यमंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री मेघनाताई साकोरे-बोर्डीकर यांनी जव्हार येथे केले.

जिल्हा परिषद आरोग्य विभाग आणि महिला व बाल विकास विभामार्फत दिनांक १४ जानेवारी २०२५ रोजी जव्हार तालुक्यातील जामसर येथे मकर संक्रांति निमित्त भव्य महिला आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते त्यावेळी त्या बोलत होत्या. राज्यातील सर्व बहिणीं पर्यंत आरोग्याच्या सेवा पोचल्या पाहिजेत या हेतूने ही मोहीम सुरू केली असून त्याची राज्यस्तरीय सुरुवात जामसर येथील शिबिरामार्फत करण्यात येत आहे याचा मला आनंद आहे. असे त्या यावेळी म्हणाल्या.

तसेच खासदारांनी केलेली रक्तपेढी आणि महिला हॉस्पिटल ची मागणी देखील मान्य करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे राज्यमंत्री मेघना साकोरे यांनी सांगितले. जिल्ह्यात चांगली आरोग्य यंत्रणा उभी करण्याचा शासनाचा मानस असून सर्वांची काळजी घेण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत असे सांगून सर्वांनी एकत्रित येऊन काम केले तर हे सहज शक्य असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम, खासदार डॉ.हेमंत सवरा, आमदार हरिश्चंद्र भोये, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, उपाध्यक्ष पंकज कोरे, सभापती बांधकाम आणि आरोग्य संदेश ढोणे, सभापती कृषी व पशु संवर्धन संदिप पावडे,जिल्हा परिषद सदस्य सुरेखा थेतले, जव्हार सभापती विजया लहारे, उपसभापती पाडवी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

महिलांनी तारपा नृत्य करून राज्यमंत्री मेघना साकोरे यांचे स्वागत केले. त्यांनी देखील महिलांच्या जोडीला तारप्यावर फेर धरला. तसेच मकर संक्रांतीनिमित्त आरोग्य विभागातील महिलांनी मेघना साकोरे यांना वाण देऊन हळदी कुंकू दिले.

सदर आरोग्य शिबिरात जव्हार तालुक्यातील माता, गर्भवती माता तसेच इतर तपासणीसाठी महिलांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावली होती. स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या आजाराची तपासणी करण्यात आली. दंतचिकित्सा, डोळे तपासणी, रक्तदाब तसेच इतर



सर्व तपासण्या या शिबिरामध्ये करण्यात आल्या. जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम यांनी फक्त दवाखाने नकोत तर त्यांच्यासोबत डॉक्टर पण हवेत अशी सर्व उपस्थित जनतेच्या वतीने मागणी केली.

खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी जिल्ह्यात महिला हॉस्पिटल आणि एक सुसज्ज सिव्हिल हॉस्पिटल,रक्तपेढी असणे गरजेचे आहे.तसेच आदिवासी भागात आरोग्य सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना अतिरिक्त भत्ता द्या, असे सांगून रिक्त जागा, तसेच आरोग्यविषयक इतर समस्या यावर प्रकाश टाकला.

विक्रमगड विधानसभा आमदार हरिश्चंद्र भोये यांनी राज्यातील पहिले शिबिर जव्हार येथे घेतल्याबद्दल आभार मानून साखरशेत प्राथमिक आरोग्य केंद्राला लवकर मंजुरी मिळणेसाठी मेघना साकोरे यांना विनंती केली.

शिबिराचे उद्घाटन झाल्यानंतर जामसर प्राथमिक आरोग्य केंद्राची पाहणी करून तेथील गर्भवती माता, प्रसूत माता यांच्याशी राज्यमंत्री मेघना साकोरे यांनी संवाद साधला.

यानंतर जव्हार येथे आरोग्य विभाग, महिला व बालविकास विभाग, पाणीपुरवठा विभागाचा विस्तृत आढावा घेऊन या विभागातील अडचणी जाणून त्यावर. सविस्तर चर्चा केली. यावेळी जिल्हाधिकारी गोविंद बोडके, प्रकल्प अधिकारी जव्हार तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

डॉ.किरण पाटील यांनी या कार्यक्रमाचे प्रस्ताविक सादर केले. यावेळी आरोग्य विभाग महिला व बालविकास विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# शहरात कायमस्वरूपी बचत गटांसाठी बचत भवन उभारणार - खासदार लंके

## बचत गटांच्या विविध स्टॉलमधून लाखोंची उलाढाल; सावित्री ज्योती गौरव पुरस्काराचे वितरण

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१५, अहिल्यानगर :** बचतगट चळवळीला संजीवनी देण्याचे काम सावित्री ज्योती महोत्सव करत आहे. मागील ८ वर्षापासून बचत गटांच्या विविध वस्तूंचे प्रदर्शन भरवून ग्रामीण उत्पादनांना शहरात बाजारपेठ मिळवून देण्याचे काम या महोत्सवाद्वारे सातत्याने सुरु आहे. शहरात कायमस्वरूपी बचत गटांसाठी बचत भवन उभा करून देण्याचे आश्वासन खासदार निलेश लंके यांनी दिली.



सावेडी, गुलमोहर रोड येथील कोहिनूर मंगल कार्यालयात सुरु असलेल्या चार दिवसीय सावित्री ज्योती महोत्सवाच्या समारोपप्रसंगी खासदार लंके बोलत होते. याप्रसंगी यावेळी डॉ.रमेश वाघमारे, प्रा.हर्षल आगळे, सिने कलाकार राजेंद्र गटणे, स्वागताध्यक्ष किशोर डागवाले, ॲड. शारदाताई लगड, सुहासराव सोनवणे, जयश्री शिंदे, लावणी सम्राज्ञी रोहिणी थोरात आदींसह बचत गटातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. पुढे खासदार म्हणाले की, बचत भवन उभारणीसाठी निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. या भवनच्या माध्यमातून बचत गटातील महिलांना कायमची जागा उपलब्ध होणार आहे. सामाजिक संस्था सेवाभावाने सामाजिक योगदान देत आहेत. सामाजिक संस्थांच्या प्रकल्प प्रस्तावांसाठी दिल्लीमध्ये पाठपुरावा केला जाणार असल्याचे स्पष्ट करुन, त्यांनी जय युवा अकॅडमी व नेहरु युवा केंद्राच्या कार्याचे कौतुक केले.

प्रास्ताविकात ॲड. महेश शिंदे यांनी सावित्री ज्योती महोत्सवाद्वारे बचत गटातील महिलांना व्यासपीठ मिळाले आहे. शहरात दरवर्षी या महोत्सवाच्या माध्यमातून लाखो रुपयांच्या उलाढाल होत असते. यावर्षी देखील महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, युवक-युवतींसाठी विविध स्पर्धा पार पडल्या. तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आल्याची त्यांनी माहिती दिली. सावित्री ज्योती महोत्सवात घेण्यात युवक-युवती व महिलांसाठी घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेचे बक्षीस वितरण खासदार लंके यांच्या हस्ते करण्यात आले. तर दर दिवशी सोडत काढून यामधील विजेत्यांना पैठणीचे बक्षीस देण्यात आले.

खासदार लंके यांनी महोत्सवाच्या प्रदर्शनातील बचत गट स्टॉलला भेट देवून महिलांशी संवाद साधला, तर बचत गटांच्या महिलांच्या समस्या, अडचणी समजून घेतल्या. विविध उत्पादनांची माहिती घेऊन थालपीठ, मोदक व इतर खाद्य पदार्थांचा आस्वाद घेतला. या महोत्सवात एल ॲण्ड टीचे व्यवस्थापक सागर ससाणे, ॲड. शारदाताई लगड, ॲड.सुमेध डोंगरे, गणेश बनकर, वसंत रांधवन, लोकनियुक्त सरपंच संजय निगडे, माजी सरपंच अनिताताई निगडे, ग्राम पंचायत अधिकारी मनीषा काळंगे, माधव बनसोडे, शुभांगी बनसोडे, प्रा.डॉ.तानाजी जाधव, शिल्पा जाधव, प्रा.डॉ.सचिन धेंडे, अश्विनी धेंडे, इंजि.आकाश सूर्यवंशी, प्रतीक्षा सूर्यवंशी, इंजि.महेश निंबाळकर, अंकिता निंबाळकर, सचिन देवळालीकर, सुजाता देवळालीकर, कावेरी कैदके, हेलन पाटोळे यांना सेमी पैठणी साडी, स्मृती चिन्ह व सन्मानपत्र देऊन सावित्री ज्योती गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# थोडक्यात

## लेखक व विद्यार्थी वाचन संवाद कार्यक्रम शिवाजी महाविद्यालयात संपन्न



**अक्षराज : आश्रुबा कोठावळे**

**दि.१९, कळंब (धाराशिव) :** कळंब येथील छत्रपती शिवाजी महाविद्यायामध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभाग व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छ.संभाजी नगर यांचे आदेशानुसार महाविद्यालयांमध्ये वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी वाचन संस्कृती विकसित व्हावी. या हेतूने महाविद्यालयांमध्ये 'लेखक व विद्यार्थी वाचन संवाद' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य शशिकांत जाधवर व प्रमुख वक्ते आश्रुबा कोठावळे (कवि व बालसाहित्यकार) यांच्या हस्ते छ.शिवाजी महाराज व संस्थेचे संस्थापक कै.नरसिंग (आण्णा) जाधव यांच्या प्रतिमाचे पूजन करून करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयातील ग्रंथालयाचे ग्रंथपाल डॉ.विद्युलता पवार, मराठी विभागाचे प्रमुख प्रा.डॉ.हनुमंत माने, हिंदी विभागाचे प्रमुख प्रा.शफीक चौधरी तसेच इंग्रजी विभाग व आयक्युएसी विभाग प्रमुख प्रा.डॉ.अनिल जगताप तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमाधिकारी प्रा.मनीषा कळसकर उपस्थित होते. यावेळी प्रमुख वक्ते आश्रुबा कोठावळे यांनी वाचन व त्याचे होणारे फायदे तसेच वाचनामुळे विद्यार्थ्यांनमध्ये शब्द भंडार वाढतो व तो लेखनाकडे वळतो वाचनाने व्यक्ति तणाव मुक्त होतो. तसेच वाचनाने स्मरणशक्ती वृद्धिंगत होते. तसेच विद्यार्थी हा वाचन संस्कृती पासून दूर जाता कामा नये. याविषयी सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमात कोठावळे यानी त्यांच्या कविता व गजल स्वःतच्या सुंदर आवाजात प्रस्तुत केल्या. त्यांनी विद्यार्थ्यांनी त्यांच्या आवडीच्या पुस्तकाचे वाचन दररोज केले पाहिजे असे आव्हान केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.शशिकांत जाधवर यांनी केले. सुत्रसंचालन डॉ. हनुमंत माने यानी केले व आभार डॉ.अनिल जगताप यानी मानले. यावेळी सभागृहात प्रा.सुनिता चोंदे, डॉ.अनंत नरवडे, प्रा.पंडित शिंदे, मुरलीधर चोंदे, दत्ता गायकवाड, सुंदर कदम महाविद्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वांचे सहकार्य लाभले.

## २३ वी छत्रपती शिवाजी महाराज चषक कबड्डी स्पर्धा २०२४-२५



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, बारामती :** महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने व पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या यजमान पदाखाली बारामती येथे दि.१५ जानेवारी २०२५ रोजी सुरू झालेल्या २३ व्या छत्रपती शिवाजी महाराज चषक वरिष्ठ पुरूष व महिला गट कबड्डी स्पर्धा सुरू झाली. या स्पर्धचे उद्घाटन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झाले.

यावेळी राज्याचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, खासदार सुप्रिया सुळे, सुनेत्रा पवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे सरकार्यवाह बाबुराव चांदेरे, खजिनदार मंगल पांडे, क्रीडा आयुक्त हिरालाल सोनवणे, जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, अतिरिक्त पोलीस अधिक्षक गणेश बिरादार, क्रीडा उपसंचालक युवराज नाईक, पुणे जिल्हा असोसिएशनचे कार्याध्यक्ष दत्ता कळमकर, सरकार्यवाह दत्ता झिंजुर्डे, स्पर्धेचे निरिक्षक रविंद्र देसाई, पंचप्रमुख सदानंद मांजलकर, सहपंच प्रमुख अनिल यादव आदी उपस्थित होते. उद्घाटन प्रसंगी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी खेळाडूंना व खेळासाठी सेवा व सुविधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी निधी कमी पडू देणार नाही, छत्रपती शिवाजी महाराज चषक कबड्डी स्पर्धेसाठी एक कोटी रुपयांची तरतुद केली आहे. त्याच प्रमाणे बक्षिसांची रक्कमही २० लाखाहून ४५ लाख रुपये केली असल्याची घोषणा केली. हे जाहिर करतानाचा क्रीडामंत्री दत्ता भरणे यांना क्रीडाखात्यासाठी भरपूर निधी उपलब्ध करून दिला जाईल याचेही आश्वासन दिले. क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे व पंकजा मुंडे यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेच्या पहिल्या दिवशी सायंकाळच्या सत्रात महिला विभागात 'ब' गटात झालेल्या सामन्यात मुंबई शहर पश्चिम संघाने रत्नागिरी संघावर २२-१७ अशी मात करीत आपल्या स्पर्धेतील पहिला विजय नोंदविला. मद्यंतराला मुंबई शहर पश्चिम संघाकडे १२-१० अशी आघाडी होती. मुंबई शहर पश्चिम संघाच्या कर्णधार सोनाली शिंगटे हिने आक्रमक खेळ करीत विजय मिळविला. तर पूजा यादव हिने सुरेख पकडी घेतल्या. रत्नागिरीच्या कर्णधार सिध्दी चाळके हिने जोरदार प्रतिकार केला. तस्मिन बुरोंडकर हिने पकडी घेतल्या. महिलांच्या ' अ ' गटात झालेल्या सामन्यात पुणे ग्रामिण संघाने मुंबई उपनगर पश्चिम संघावर ३०-१७ अशी मात करीत आपल्या गटात पहिला विजय नोंदविला. मद्यंतराला पुणे ग्रामीण संघाकडे १९-८ अशी आघाडी होती. पुणे ग्रामीण संघाच्या कर्णधार सलोनी गजमल हिने चौफेर आक्रमण करीत आपल्या संघाला सहज विजय मिळवून दिला. रेखा सावंत हिने चांगल्या पकडी घेतल्या. मुंबई उपनगर पश्चिमच्या संघाच्या प्रणाली नागदेवते हिने चांगला प्रतिकार केला. पुरूषांच्या ' अ ' गटात पुणे ग्रामीण संघाने मुंबई शहर पूर्व संघावर ५४-२७ असा दणदणीत विजय मिळविला. मद्यंतराला पुणे ग्रामीण संघाकडे २८-१४ अशी आघाडी होती. पुणे ग्रामीण संघाच्या जीवन डोंबले याने आक्रमक खेळ करीत मैदान गाजविले व आपल्या संघाला सहज विजय मिळवून दिला.

मुंबई शहर पूर्व संघाच्या कर्णधार प्रणय राणे याने काहीसा प्रतिकार केला. पुरूषांच्या 'क' गटात झालेल्या सामन्यात नंदुरबार संघाने मुंबई उपनगर पश्चिम संघावर ३६-२७ असा विजय मिळविला. मध्यंतराला नंदुरबार संघ १५-१७ असा पिछाडीवर होता. नंदुरबारच्या ओंकार गाडे व जयेश महाजन यांनी मध्यंतरानंतर अधिक आक्रमक खेळ करीत आपल्या संघाला विजय मिळवून दिला. दिपक शिंदे याने पकडी घेत चांगली साथ दिली. मुंबई उपनगर पश्चिमच्या रजत सिंग याने उत्कृष्ट चढाया केल्या तर अक्षय तावडे याने काही चांगल्या पकडी घेतल्या.